देवतांची उपासना : शिव – खंड १

# शिवाविषयी अध्यात्मशास्त्रीय विवेचन

मराठी (Marathi)


**संकलक**

हिंदु राष्ट्र-स्थापनेचा उद्‌घोष करणारे

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले**

**पू. संदीप गजानन आळशी**




**सनातन संस्था**


मार्च २०२३ पर्यंत सनातनच्या ३६० ग्रंथांच्या मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराती, कन्नड, तमिळ, तेलुगु, मल्ल्याळम्, बंगाली, ओडिया, आसामी, गुरुमुखी, सर्बियन, जर्मन, स्पॅनिश, फ्रेंच आणि नेपाळी या १७ भाषांत ९३ लाख प्रती !

# ग्रंथाच्या संकलकांचा परिचय

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या अद्वितीय कार्याचा संक्षिप्त परिचय



१. अध्यात्मप्रसारार्थ ‘सनातन संस्थे’ची स्थापना

२. शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी ‘गुरुकृपायोग’ या साधनामार्गाची निर्मिती : गुरुकृपायोगानुसार साधना करून २५.३.२०२३ पर्यंत १२३ साधक संत झाले, तर १,०८७ साधकांची संतत्वाच्या दिशेने वाटचाल चालू आहे.

३. आचारधर्मपालन, देवता, साधना, आदर्श राष्ट्ररचना, धर्मरक्षण आदी विविध विषयांवर विपुल ग्रंथ-निर्मिती

४. हिंदुत्ववादी नियतकालिक ‘सनातन प्रभात’चे संस्थापक-संपादक

५. हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्घोष (वर्ष १९९८)

६. ‘हिंदु राष्ट्रा’च्या स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्ववादी आदींचे संघटन आणि त्यांना दिशादर्शन !

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा – www.Sanatan.org)**

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे साधकांना आश्वासन !**

स्थूल देह असे स्थळकाळाची मर्यादा ।
कैसे असू सर्वदा सर्वा ठायी ।।
सनातन धर्म माझे नित्य रूप ।
त्या रूपे सर्वत्र आहे सदा ।। – जयंत बाळाजी आठवले
१५.५.१९९६

## पू. संदीप गजानन आळशी यांचा परिचय



सनातनच्या ग्रंथांच्या निर्मितीची सेवा करण्यासह राष्ट्रजागृती आणि धर्मप्रसार करणारे प्रसारसाहित्य (उदा. सनातन पंचांग, धर्मशिक्षण फलक इत्यादी) यांसाठी लेखन करतात. साधना, राष्ट्र अन् धर्म यांसंबंधी नियतकालिक ‘सनातन प्रभात’मधून प्रबोधनपर लेखनही करतात.

---

## ग्रंथाची अनुक्रमणिका

(प्रकरणातील वैशिष्ट्यपूर्ण मथळे खाली दिले आहेत.)


**प्रकरण १. शिवाची व्युत्पत्ती आणि नावांचे अर्थ** ९

१ अ. व्युत्पत्ती आणि अर्थ ९

१ आ. काही नावांचे आध्यात्मिक अर्थ ९

**प्रकरण २. शिवाचे मूर्तीविज्ञान आणि सात्त्विक चित्र** १२

२ अ. मूर्तीविज्ञान १२

२ अ १. शिश्नरूप १२

२ अ २. प्राणीरूप १२

२ अ ३. मानवीरूप १२

२ अ ४. पिंडीरूप १४

२ आ. सनातन-निर्मित ‘शिवाचे सात्त्विक चित्र आणि नामजप-पट्टी’ २७

२ इ. योगतज्ज्ञ प.पू. दादाजी वैशंपायन यांनी परात्पर गुरु डॉ. आठवले यांना दिलेल्या शिवाच्या चित्रात पालट होण्याचे शास्त्र ३४

**प्रकरण ३. शिवाची रूपे आणि परिवार** ३९

३ अ. शिवाची रूपे : रुद्र, कालभैरव, वीरभद्र, भैरव (भैरवनाथ), वेताळ, भूतनाथ, नटराज आणि किरात ३९

३ आ. परिवार : पत्नी, पुत्र, शिवगण, शिवदूत आणि वाहन (नंदी) ४७

**प्रकरण ४. शिवाची वैशिष्ट्ये आणि कार्य** ५१

४ अ. वैशिष्ट्ये ५१

४ अ १. शारीरिक आणि भौतिक वैशिष्ट्ये ५१

४ अ २. आध्यात्मिक वैशिष्ट्ये ५४

४ आ. कार्य ५२

४ आ १. विश्वाची उत्पत्ती ५५

४ आ ३. स्वतः साधना करून सर्वांची उत्तरोत्तर प्रगती करून घेणारा ५७

**प्रकरण ५. शिवाचा 'लोक', निवास आणि प्रसिद्ध स्थाने** ५९

५ अ. शिवाचा 'लोक' आणि निवास ५९

५ आ. शिवाची प्रसिद्ध स्थाने : बारा ज्योतीर्लिंग, अमरनाथ अन् काशी ५९

**प्रकरण ६. शिव आणि शक्ती** ६२

६ अ. तंत्रशास्त्र (शक्तीसंबंधित शास्त्र) ६२

६ आ. शिव आणि शक्ती ६३

**卐 प्रस्तुत ग्रंथाचे असामान्यत्व लक्षात घ्या !** ६६

**卐 संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती** ७०

---

**टीप :** ग्रंथात काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी संकेतांक केवळ कार्यालयीन सोयीसाठी दिले आहेत.

## ग्रंथाचे मनोगत

एखाद्या देवतेसंबंधी आपल्याला अध्यात्मशास्त्रीय ज्ञान कळले, तर त्या देवतेविषयी आपली श्रद्धा अधिक वाढायला साहाय्य होते. श्रद्धेमुळे साहजिकच उपासना भावपूर्ण व्हायला साहाय्य होते आणि भावपूर्ण उपासना ही अधिक फलदायी असते. या दृष्टीने या मालिकेतील ग्रंथांत शिवाविषयीचे सर्वसाधारणतः इतरत्र कोठेही न आढळणारे, पण उपयुक्त असे अध्यात्मशास्त्रीय विवेचन करण्यावर भर दिला आहे.

शिवाची काही नावे आणि गंगा, तिसरा डोळा, नाग, भस्म, रुद्राक्ष इत्यादी शिवाच्या वैशिष्ट्यांचा आध्यात्मिक अर्थ; महातपस्वी, भुतांचा स्वामी, विश्वाची उत्पत्ती करणारा यांसारखी आध्यात्मिक वैशिष्ट्ये अन् कार्ये; रुद्र, कालभैरव, नटराज इत्यादी रूपे; ज्योतिर्लिंगे इत्यादींविषयीची तात्त्विक विवेचनासह भस्म लावणे, नंदीच्या शिंगांमधून शिवलिंगाचे दर्शन घेणे, शिवाला बेल आणि अक्षता वहाणे; पण हळद-कुंकू न वाहणे यांसारखी उपासनेशी संबंधित प्रायोगिक विवेचनही शास्त्रासह दिली आहे. शृंगदर्शन, शिवाला बेल वहाणे, अभिषेक करणे इत्यादींच्या वेळी सूक्ष्मातून नेमकी काय प्रक्रिया घडते, हे सर्वसामान्य व्यक्तीला कळू शकत नाही. हे कळण्याची क्षमता असलेल्या सनातनच्या साधकांनी केलेली 'सूक्ष्म ज्ञानाविषयीची परीक्षणे' आणि काढलेली 'सूक्ष्म ज्ञानाविषयीची चित्रे' हे या ग्रंथांचे एक आगळे वैशिष्ट्य आहे.

शिवाविषयीचे हे अध्यात्मशास्त्रीय विवेचन शिवभक्तांना आणि शिवाची सांप्रदायिक साधना करणाऱ्यांना निश्चितच उपयुक्त ठरेल; परंतु सर्वसाधारण व्यक्तीने यासंदर्भात पुढील नियम लक्षात ठेवावा. रामायण वाचले की श्रीरामाची, श्री गणपति अथर्वशीर्ष वाचले की श्री गणपतीची अन् देवीमाहात्म्य वाचले की देवीची उपासना करावी, असे काही जणांना वाटते. त्याच प्रकारे या ग्रंथमालिकेतील विवेचन वाचून 'आपणही शिवाची उपासना करावी', असे काही जणांना वाटण्याची शक्यता आहे. अशा व्यक्तींनी हे लक्षात ठेवले पाहिजे की, अशा प्रकारच्या उपासनेने सर्वांचीच आध्यात्मिक

उन्नती लवकर होत नाही; कारण शिव इत्यादी देवतांची उपासना करणे त्यांना आवश्यक असले, तरच त्या उपासनेचा अधिक लाभ होतो, नाहीतर फार साधना करूनही फारच थोडी प्रगती होते. शिवाची उपासना ही पुढच्या टप्प्याची उपासना आहे. ती करणे आवश्यक आहे कि नाही, हे सर्वसाधारण व्यक्तीला कळत नाही, तर अध्यात्मदृष्ट्या उन्नत असलेलेच ते सांगू शकतात; म्हणून सर्वसाधारण व्यक्तीने केवळ ज्ञात (माहीत) व्हावे म्हणूनच हे ग्रंथ वाचावेत. पुढे शिवाची अनुभूती येण्याच्या दृष्टीने साधनेचा पहिला टप्पा म्हणून आपल्या कुलदेवतेच्या नावाचा 'श्री... (कुलदेवी / कुलदेव यांच्या नावाचा चतुर्थीचा प्रत्यय)... नमः ।' या पद्धतीने (उदा. कुलदेवी भवानी असल्यास 'श्री भवानीदेव्यै नम:' याप्रमाणे) नामजप करावा. पुढे गुरूंनी शिवाचा नामजप करण्यास सांगितले, तर त्या वेळी या विवेचनाचा उपयोग शिवावरील श्रद्धा वाढण्यासाठी होईल. इतरांना या ग्रंथांतील विवेचन वाचून शिवाविषयी काहीतरी नवीन कळले, असे जाणवेल.

हे ग्रंथ वाचून शिवाच्या उपासकांची शिवावरील श्रद्धा दृढ होवो आणि त्यांना अधिक साधना करण्याची प्रेरणा मिळो, ही श्री गुरुचरणी प्रार्थना. – **संकलक**

## वाचकांना निवेदन !

'या ग्रंथात सूक्ष्म परीक्षण, सूक्ष्म ज्ञानाविषयीची चित्रे, तसेच 'पी.आय.पी.'(पॉलीकॉन्ट्रास्ट इंटरफेरन्स फोटोग्राफी)' तंत्रज्ञानाच्या साहाय्याने केलेली वैज्ञानिक चाचणी 'महर्षि अध्यात्म विश्वविद्यालया'च्या सौजन्याने घेतले आहे.' – **प्रकाशक**

सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या एक आध्यात्मिक उत्तराधिकारी श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ यांना पूर्वी सूक्ष्म-जगतातील एक विद्वान किंवा गुरुतत्त्व यांच्या माध्यमातून ज्ञान मिळायचे.